# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. २७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०१/२०१८

**१) संगनमत करुन विवाहितेचा पैश्यासाठी शारिरीक व मानसीक त्रास दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २४/०१/२०१८ ते आज पावेतो यातील फिर्यादीचे लग्न आरोपी क्र. १ सोबत दिनाक २४/०४/२०१७ ला जाती रिवाजा प्रमाणे झाले असुन आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करुन कॉलेज मध्ये ३,००,०००/–रु. डोनेशन दयाचे आहे? असे म्हणुन फिर्यादी कडे पैशाची मागणी केली तसेच लग्नात तुझ्या वडीलांना मानमान केले नाही, असे म्हणुन फिर्यादीस शारिरिक व मानसीक त्रास दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट व प्रगती कौटुंबीक सल्ला व मार्गदर्शन केंद्र लाखनी यांचे लेखी पत्रा वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४९८,३४ भादवी. सहकलम ३,४ हुंडा प्रतिबंधक कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२) बिना नंबरची मोटार सायकलच्या धडकेत दोन मुलींना जखमी झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०१/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची पुतनी कु. तोशीका सदाशिव पाखमोडे वय ६ वर्ष, व कु. तेजस्विनी पाखमोडे वय १० वर्ष हे शाळेच्या जेवणाच्या सुट्टीच्या वेळेस घरी जेवन करण्यास पायी जात असतांनी यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बिना क्र. असलेली मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन दोन्ही मुलींना जखमी केल्याने फिर्यादी लहु यशवंत पाखमोडे वय ४० वर्ष, रा. मानेगाव बेळा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४,५०(१)/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) एटीएम कार्ड वरुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०१/२०१८ चे ०४/०९/२०१७ पर्यत यातील नमुद आरोपी ईसमांवर फिर्यादीने विश्वास ठेवुन पैसे काढण्यासाठी दिलेले एटीएम कार्ड व कोड नंबरचा वापर करुन फिर्यादीचे खात्यातुन १,७६,०००/–रु. रक्कम काढुन फसवणुक केल्याने फिर्यादी रमेश शंकर खेडेकर वय ६० वर्ष, शिव नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६ (ड) मा.तं.कायदा २००० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. कंकाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमीष दाखवुन फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०१/२०१८ चे १५.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचे घराजवळ किरायाने राहत असता फिर्यादीची बहीन हिला यातील आरोपीने अल्पवयीन असतांना सुध्दा तिला लग्नाचे आमीष दाखवुन फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३६३,३६६(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. किचक पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत. .

**५)संगनमत करुन लोहाच्या सलाखीची चोरी . :–**

दिनांक १०/०१/२०१८ चे १९.३० ते २१.३० वाजता. दरम्यान यातील आरोपीतांनी ग्रा. पं. बेटाळा आवारातील बिएसएनएल टॉवरला लागणाऱ्या ८ एमएच च्या लोहाच्या सलाखी ४० नग किंमती १२,००/–रु. चे असलेल्या चोरुन नेल्याने फिर्यादी शंकर देवराम गिरडकर वय ४० वर्ष, रा बेटाळा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे. .

**६) अज्ञात ट्रॅक्टरच्या धडकेत दोन जखमी . :–**

दिनांक १२/०१/२०१८ चे १९.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी विकेश भाऊराव भोयर वय २४ वर्ष, रा. टाकळी पु. हा त्याचे मामा चरणसह हिरो होंडा स्पलेन्डर प्लस मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ९१३७ ने भंडारा वरुन दाभा येथे घरी येत असतांना मागेहुन येणाऱ्या यातील अनोळखी लाल रंगाची ट्रॉली असलेला ट्रॅक्टर आरोपी चालकाने ओव्हरटेक करीत असता त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला गणेश नगरी जमनी येथे धडक देवुन मोटार सायकल वर बसलेले फिर्यादी व त्याचा मामा यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भाजीपाले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. .

**७) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०१/२०१८ चे ०२.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादी श्रीकांत विठ्ठलराव येरकुडे वय ४५ वर्ष, रा. आंधळगाव याला सार्वजनिक ठिकाणी म्हणाला की तुझ्या घराचे सज्ज्याचे काम बंद कर? असे बोलुन अंगावर चवतारुन धावला व अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**८) प्रकुती खराब झाल्याने औषधोपचारा दरम्यान मुलाचा मृत्यु . :–**

दिनांक १३/०१/२०१८ चे १२.०० वाजता. दरम्यान यातील मृतक अविश्कार आदेश बनकर वय १० वर्ष, रा. सिव्हील लाईन भंडारा हा निमोनीयाचा आजार असुन प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु भंडारा येथे आयसीयु विभागात भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**९) अवैध दारु/जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक १३/०१/२०१८रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, मोहाडी, तुमसर, आंधळगाव, साकोली, पवनी व भंडारा येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १४५ लिटर ५०० देशी दारू+ ४ ग्लास नगदी १५० /–रु किंमती ८८९०/–रु, ४ लिटर ८६० मिली लिटर देशी दारु किंमती १३९६/–रु. तसेच जुगारातुन किंमती ३१५/–रु. असा एकुण किंमती १०,६०१/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १३/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी – ०५ तीन सिटर वाहनांवरती– ११ केसेस व ईतर वाहनांवरती –११३ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.